# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 01/02/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

### चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील गांधी चौक रामटेक, अंबिका मेडीकल स्टोअर्स येथे दिनांक ३१/०१/२०२४ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. कमलाबाई रामदास घरडे, वय ६५ वर्ष रा. हिवरा बेंडे ही गावागावात लेडीज लोकांना लागणारे बांगडया, कानातले, मेकअपचे सामानाचे दुकान लावण्याचे काम करते. दि. ३१/०१/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा. दरम्यान पैशाचे काम असल्याने फिर्यादीचे बँकेचे खाते बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा गांधी चौक रामटेक येथे असल्याने बँकेत पैसे काढण्याकरिता आली होती. व खात्यातुन ३५,०००/— रू. काढले आणि बीपीचा त्रास असल्याने फिर्यादीला औषधी घ्यायचे असल्याने बँकेतुन काढलेल्या ३५,०००— रू. पैकी ५००/— रू. वेगळे काढून ठेवले आणि ३४,५००/— रू. जवळ असलेल्या कापडाच्या पिशवीत ठेवले व गांधी चौकात असलेल्या अंबिका मेडीकल स्टोर्स मध्ये वेळ दुपारी १२/०० वा. ते १२/३० वा. दरम्यान औषधी घेण्याकरीता गेली. अंबिका मेडीकल मधुन औषधी विकत घेतली आणि औषधी घेतल्यानंतर फिर्यादीचे हातात असलेल्या कापडाच्या पिशवीला चेक केले असता कापडाच्या पिशवीत पैसे दिसले नाही तसेच पिशवी खालुन कापलेली दिसली औषधीच्या दुकानात हजर असलेल्या लोकांना विचारपूस केले तर त्यांनी सांगितले की, आमच्या औषधीच्या दुकानातुन औषधी घेते वेळी तुमच्या बाजुला दोन महीला उभ्या होत्या. पण आम्ही त्यांना ओळखत नाही. पण कोणीही काही सांगितले नाही. त्यावरून कोणीतरी अज्ञात महीला चोरांनी फिर्यादी जवळ असलेल्या कापडाच्या पिशवीला कापुन त्यामध्ये ठेवलेले ५००—५०० रु. च्या नोटा असे एकुण ३४,५००/— रू. ची चोरी केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे महिला आरोपींविरूद्ध कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार शामराव रामटेके यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शामराव रामटेके हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा आमडी फाटा येथे दिनांक ३०/०१/२०२४ चे २२.०० वा. ते दिनांक ३१/०१/२०२४ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— हर्षल महाविर कंभाले, वय २४ वर्षे रा. पारशिवनी ता. पारशिवनी याच्या मालकीचे उभ्या असलेल्या जे. सी. बी. गाडी क्र. एम. एच.—४०/सी.ए.—२९४७ मधील एक एक्साईड कंपनीची बॅटरी किंमती ८०००/—रू. व जे. सी. बी. खाली लागलेला हायड्रोलीक पंप किंमती ३०,०००/—रू. असा एकूण ३८,०००/—रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपींविरूद्ध कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोहवा उमेश इंगळे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार साहेबराव मसराम पो.स्टे. पारशिवनी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**